# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

वाहतूक खाते,मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-४००००८
दूरध्वनी क्र.०२२-२३०२३९०० e mail:gmtraffic@msrtc.gov.in

क्र.राप/वाह/सवलत/अ.जे.ना./२२१२ दिनांक: २५ ऑगस्ट,२०२२

**परिपत्रक क्र. ०८ /२०२२**

**प्रति.**

**उपमहाव्यवस्थापक (नियंत्रण समिती क्र. १/ २/ ३)**

**विभाग नियंत्रक, रा.प.** मुंबई/ पालघर/ रायगड(पेण)/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ ठाणे/ नाशिक/ धुळे/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली/अकोला/अमरावती/यवतमाळ/ बुलडाणा विभाग.

**विषय:-** ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये विनामुल्य प्रवास सवलत व ६५वर्ष ते ७५ वर्षापर्यंत ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये ५० % सवलत अनुज्ञेय करणेबाबत.

**संदर्भ :-**१.शासन निर्णय क्र.टीसी १९९५/२०३९/प्र.क्र.१२०/ परि -१ दि. २५.०१.१९९६.
२.शासन निर्णय क्र.एस टीसी ३४०८/१५/प्र.क्र.९८/ परि -१ दि. २१.०६.२००८.
३.महामंडळ संचालक मंडळ ठराव क्र.२०१८:०४:०५, दि.०७/०४/२०१८.
४.शासन निर्णय क्र.एसटीसी १०१७/प्र.क्र.५२५/ परि-१, दि.०९.१०.२०१८.
५.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३२/२०१८,पत्र क्र.राप/वाह/सवलत/जे.ना./ ४७२६,दि.१२.१०.२०१८.
६.या कार्यालयाचे पत्र क्र.राप /सवलत/जे.ना/४९२५,दि.२४.१०.२०१८.(शुध्दीपत्रक)
७. मा. अप्पर मुख्य सचिव गृह विभाग यांचे पत्र क्र. अ.शा.पत्र क्र. एसटीसी- ०८२२/प्रक्र.२२०/परि-१,दि. २४.०८.२०२२.

-----

मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७५ व्या वर्षात पदार्पण निमित्ताने दि. १६.०८.२०२२ रोजी महाराष्ट्र राज्यातील ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बस प्रवास भाड्यामध्ये १०० % सवलत देण्याचे घोषित केले आहे.सदर घोषणेच्या अनुषंगाने मा. अप्पर मुख्य सचिव गृह विभाग यांचे पत्र क्र. अ.शा.पत्र क्र. एसटीसी-०८२२/प्रक्र.२२०/परि-१,दि. २४.०८.२०२२ अन्वये महाराष्ट्र राज्यातील ६५ वर्षा वरील ज्येष्ठ नागरिकांना सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये ५०% सवलत व ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना रा.प.महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये विनामुल्य प्रवास अनुज्ञेय करणे बाबत निर्देश प्राप्त झाले.

शासन निर्णय क्र.टीसी १९९५/२०३९/प्र.क्र.१२०/परि-१, दिनांक २५.०१.१९९६ अन्वये महाराष्ट्र राज्यातील ६५ वर्षापेक्षा जास्त वय असणा-या जेष्ठ नागरिकांकरिता रा.प. साध्या बसेसमध्ये प्रवासभाडयात ५०% सवलत अनुज्ञेय करण्यात आली असून शासननिर्णय क्र.टीसी ३४०८/१५/प्र.क्र.९८/परि-१,दिनांक २१.०६.२००८अन्वये रा.प. महामंडळाच्या साध्या बसेसमधुन देण्यात येणारी ५०%सवलत निमआराम बसेसमध्ये देखील लागू करण्यात आली आहे.तसेच दि.०१.०६.२०१८ पासुन सदरची सवलत शिवशाही बसेसमध्ये (आसनी व शयनयान ) अनुक्रमे ४५% व ३० % लागु करण्यात आली.



Scanned by CamScanner

७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये विनामुल्य प्रवास सवलत व ६५वर्ष ते ७५ वर्षापर्यंत ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये ५० % सवलत अनुज्ञेय करणेबाबत पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १ | ६५ ते ७५ वर्ष वयोगटातील व ७५ वर्ष वयावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना रा.प. महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये अनुक्रमे ५० % व १०० % सवलत दि.२६.०८.२०२२ (दि. २५.०८.२०२२ व दि. २६.०८.२०२२ ची मध्यरात्र)पासुन अनुज्ञेय करण्यात येत आहे. |
| २ | तसेच सदरची सवलत ही भविष्यात रा.प महामंडळाच्या ताफ्यात नव्याने दाखल होणा-या बसेस करिता देखील लागु राहील. |
| ३ | सदर योजना ही **अमृत ज्येष्ठ नागरिक योजना** या नावाने संबोधण्यात येईल. |
| ४ | सदरची सवलत महाराष्ट्र राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र राज्याच्या हद्दी पर्यंत अनुज्ञेय आहे. |
| ५ | सदर सवलती करीता आधारकार्ड, निवडणुक ओळख पत्र , केंद्र/ राज्य शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा-यांना दिलेली ओळखपत्र, (मात्र त्यावर फोटो,जन्म तारीख, रहिवासी पत्ता अनिवार्य आहे) पासपोर्ट, ड्रायव्हींग लाइसन्स,पॅनकार्ड,तहसिलदार यांनी दिलेले ओळखपत्र व रा प महामंडळाव्दारे देण्यात येणारे स्मार्टकार्ड, डीजी लॉकर, एम आधार ही ओळखपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत. |
| ६ | ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यात १००% सवलत असली तरी या योजनेतील जे प्रवाशी संगणकीय आरक्षण सुविधेव्दारे, विंडो बुकींगव्दारे, ऑनलाईन, मोबाईल ॲपव्दारे, संगणकीय आरक्षाणाव्दारे तिकीट घेतील अशा प्रवाशांकडुन सेवा प्रकार निहाय लागु असलेला आरक्षण आकार वसुल करण्यात यावा. |
| ७ | दि. २६.०८.२०२२ च्या पूर्वी आगाऊ आरक्षण केलेल्या प्रवाशांकरिता परिपत्रक लागू होणा-या तारखेनंतर प्रवास सुरु केल्यास त्या ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना तिकीटाचा परतावा देण्यात यावा. याकरिता सदर प्रवाशांनी नजिकच्या आगारात / बसस्थानकावर परताव्याकरिता अर्ज व वयाच्या पुराव्याची प्रत सादर करावी. आगार व्यवस्थापक / स्थानक प्रमुखांनी त्याची खातरजमा करुन त्याचा प्रचलित कार्यपध्दतीनुसार परतावा करावा. सदर परतावा दिलेल्या रक्कमेची मागणी सवलत मासिक विवरणपत्रात समायोजित करण्यासाठी दर्शवावी. |
| ८ | ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाड्यात शासनाने १००% सवलत दिली असल्याने प्रवासभाडे आकारले जाणार नाही. सवलतीच्या मासिक विवरण पत्रामध्ये प्रवासभाड्यातील अपघात सहाय्यता निधी व वातानुकूलित सेवांकरिता वस्तू व सेवा कराच्या रक्कमेसह प्रतिपूर्तीसाठी दर्शवावी. |
| ९ | **मॅन्युअल पद्धतीने तिकीट देण्याची कार्यवाही-** ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांनी केलेल्या प्रवासाच्या मुल्याची परिगणना करणेसाठी स्वतंत्र तिकीट छपाई करावी लागेल. (व्हायलेट +लाल रंगाचे बेसिक व तपकीरी + हिरवा रंगाचे जोड) सदरची सवलत ही १००% असल्यामुळे त्या तिकीटांचे वसूली मूल्य शून्य राहिल. परंतू तिकीटांवर साध्या तिकीटांप्रमाणे मुल्य असेल. प्रवास केलेल्या ज्येष्ठ नागरिकांची एकूण संख्या परिगणित व्हावी म्हणून प्रत्येक ज्येष्ठ नागरिकास वाहकाने मुळ तिकीट देणे बंधनकारक आहे. तिकीटे देण्याची कार्यवाही प्रचलित कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी.<br>७५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाडयात १०० % सवलत दयावयाची असली तरी त्याची प्रतिपूर्ती शासनाकडे मागणीसाठी त्यांना ईटीआय-ओआरएस कार्यप्रणाली बंद पडल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून छापील तिकीटे देणे आवश्यक आहे. त्यासाठी रु.५/- , रु.१०/- मुल्यवर्गाची मूळ तिकीटे व रु. १०/-,रु.२०/- रु.३०/-, रु.४०/- रु.५०/- व रु.१००/- मुल्यवर्गाची जोड तिकीटे देण्यात यावीत. सदर तिकीटांबावत सूचना स्वतंत्र निर्गमित करण्यात येतील.<br>ही तिकीटे वाहकांना उपलब्ध करुन देण्यास काही काळ जाणार असल्याने तसेच ज्या आगारांमध्ये ईटीआय मशिन नादुरुस्त आहेत अशा आगारांमध्ये वाहकांनी कामगिरीवर असताना खालील नमुन्यात ७५ वर्षावरील प्रवाशाची माहिति भरुन घेण्यात यावी.<br><br>..३.. |

Scanned by CamScanner

तारीख ----- कामगिरी क्रमांक--- वाहकाचे नाव -------

| अ.क्र. | ७५वर्षावरील ज्येष्ठ नागरिक असल्याबाबतचा पुरावा कार्ड क्रमांक | सवलतधारी ज्येष्ठ नागरिकाचे नाव | प्रवास | | होणारे एकूण प्रवासभाडे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |

| | |
|---|---|
| १० | ईटीआयएम ओआरएस प्रणाली - ७५ वर्ष वयावरील ज्येष्ठ नागरिकांना शून्य मूल्य वर्गाचे तिकीट देण्यात येईल. सदर सवलतीच्या प्रतिपूर्तीची रक्कम ईटीआयएम ओआरएस कार्यप्रणालीतून प्राप्त होणा-या अहवालामध्ये तपशिलवार प्राप्त होईल. सदरची सवलत ईटीआय मशिनमधील Concession बटण मधील जसे ११ क्रमांकाचे निवड करुन ज्येष्ठ नागरिक तिकीट निघते तसे ७६ क्रमांकाची अमृत ज्येष्ठ नागरिकाचे/अमृत सिनिअर सिटीझन सवलतीचे तिकीट निघेल. अशाप्रकारे शुन्य मुल्याचे तिकीट काढुन ७५ वर्ष वयावरील ज्येष्ठ नागरिकांस देण्यात यावे. |
| ११ | स्मार्टकार्ड कार्यप्रणाली- ६५ ते ७५ वर्ष वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये ५०% सवलत व ७५ वर्षा वरील ज्येष्ठ नागरिकांना रा.प.महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बससेवेमध्ये विनामुल्य प्रवास सवलतीच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल स्मार्टकार्ड कार्यप्रणाली मध्ये करण्यात येतील. याबाबतच्या स्वतंत्र सूचना निर्गमित करण्यात येतील. ज्या ज्येष्ठ नागरिकांना अद्याप पर्यंत स्मार्टकार्ड प्राप्त झालेले नाही अश्या ज्येष्ठ नागरिकांना सद्यस्थितीत ग्राह्य धरण्यात येणा-या ओळखपत्रांच्या आधारे सवलत देण्यात यावी. तथापि कोणत्याही ज्येष्ठ नागरिकांना वयाचा योग्य पुरावा असताना सवलत नाकारण्यात येऊ नये अशा सक्त सुचना सर्व वाहकांना देण्यात याव्यात. याबाबत आगारातील पटावरील अनुक्रमणिकेनुसार वाहकांचा सूचना मिळाल्याबाबत स्वाक्षरी घेण्यात यावी व त्याची तपासणी विभागातील अधिका-यांनी करावी. |
| १२ | ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणा-या १००% विनामुल्य प्रवास सवलतीच्या रकमेची परिगणना करणेसाठी लेखा खात्यामार्फत लेखाशीर्ष देण्याची कार्यवाही करण्यात येईल. |
| १३ | सदरची सवलत शहरी बससेवेकरिता अनुज्ञेय नाही. |

सदर सवलतीपोटी शासनाकडून प्रतिपूर्ती म्हणून मिळणा-या रक्कमेचे मूल्य मोठे असल्यामुळे सदर रकमेची परिगणना आगार स्तरावर अचूक व तंतोतंत होईल याची दक्षता घ्यावी. त्याकरिता दैनंदिन आगार लेखाकारांनी त्याचे अंकेक्षण करावे. **ज्येष्ठ नागरिक सवलतीच्या संदर्भात हिशोब, तपासणी, अंकेक्षणाची पद्धती याबाबतच्या सुचना स्वतंत्र परिपत्रकाव्दारे लेखा शाखेव्दारे निर्गमित करण्यात येणार आहे.**

विभाग नियंत्रकांनी विभागीय वाहतूक अधिकारी, विभागीय लेखाधिकारी, आगार व्यवस्थापक, आगार लेखाकार, स्थानकप्रमुख यांच्या बैठका आयोजीत करुन सदर सवलतीबाबत सविस्तर सुचना द्याव्यात. आगार व्यवस्थापकांनी प्रस्तुत सवलतीची माहिती सर्व पर्यवेक्षकीय कर्मचारी व चालक वाहक यांना व्हावी या हेतुने कर्मचारी सुचना फलक, रोकडतिकिट विभाग, स्थानक प्रमुख कार्यालय, प्रवासी सुचना फलक इ. ठिकाणी सदर सवलती बाबतची माहिती वाचनीय व दर्शनीय स्वरुपात प्रसिद्ध करण्यात यावी.

सदरचे परिपत्रक हे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सोबत:- ५०% सवलतीचे सुधारित टप्पा व दरपत्रक.

शि. म. जमादार

**महाव्यवस्थापक (वाहतूक)**



Scanned by CamScanner

**प्रत रवाना:**

- मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे स्वीय सहाय्यक, यांस मा.महोदयांच्या माहितीस्तव सादर.
- मा. अप्पर मुख्य सचिव गृह (परिवहन)विभाग, मंत्रालय मुंबई यांचे स्वीय सहाय्यक यांस मा.महोदयांच्या माहितीस्तव सादर.
- मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे स्वीय सहाय्यक यांस मा. महोदयांच्या माहितीस्तव सादर.
- वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांस माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
- मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)/ महाव्यवस्थापक (यं.अ.)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (स्थापत्य) / महाव्यवस्थापक (भांडार व खरेदी)/ विधी सल्लागार वर्ग-१/ सचिव, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ/ मुख्य सांख्यिकी अधिकारी.
- जनसंपर्क अधिकारी यांस कळविण्यात येते की, सदर बाबीस आवश्यक ती प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.
- उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) यांस कळविण्यात येते की, सदरची संगणकीय ईटीआयएम ओआरएस कार्यप्रणाली तातडीने कार्यान्वीत (Live) करावी.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे, कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प. पुणे/ नागपूर / औरंगाबाद यांस माहितीस्तव.
- मे. ईविक्सकश मोबिलिटी सॉफ्टवेअर इंडिया लि. यांस माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

महाव्यवस्थापक (वाहतूक)

Scanned by CamScanner